॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office जनसंपर्क विभाग

जळगाव. दि.२९ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर दोन सदस्य निवडून देण्यासाठी आज दि.२९ मे रोजी झालेल्या निवडणूकीत विद्या परिषदेतून प्रा.प्रिती अग्रवाल व प्रा.जितेंद्र नाईक हे दोन सदस्य निवडून आले.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विद्या परिषदेची बैठक झाली. महिला संवर्गातून व्यवस्थापन परिषदेवर एक सदस्य निवडून द्यावयाचा होता. त्यासाठी प्रा.प्रिती अग्रवाल (जळगाव ) व प्रा.शुभांगी राठी (भुसावळ) या निवडणूक रिंगणात होत्या. आजच्या बैठकीत झालेल्या मतदानात प्रा.प्रिती अग्रवाल यांना ३६ तर प्रा.शुभांगी राठी यांना २० मते प्राप्त झाली. प्रा.प्रिती अग्रवाल या विजयी झाल्या. ५७ पैकी ५६ मते वैध ठरली तर एक मत अवैध ठरले. प्रा.अग्रवाल या जी.एच.रायसोनी इन्स्टिटयूट ऑफ बिझीनेस ॲण्ड मॅनेजमेंटच्या संचालक आहेत.

शिक्षकांमधून निवडून द्यावयाच्या जागेसाठी तीन उमेदवार रिंगणात होते. त्यापैकी प्रा.जितेंद्र नाईक (उमवि) हे ३५ मते प्राप्त करुन विजयी ठरले. प्रा.त्र्यंबक पाटील (धुळे) यांना २१ तर प्रा.पुष्पा गावीत (धुळे) यांना एकही मत प्राप्त झाले नाही. एकूण ५७ पैकी ५६ मते वैध ठरली तर एक मत अवैध ठरले. प्रा.नाईक हे विद्यापीठातील रसायन तंत्रज्ञान संस्थेचे संचालक आहेत.

विद्या परिषदेच्या दिवसभर चाललेल्या आजच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा झाली. विद्यापीठातील बहिस्थ विभाग हा आयडीयल बहिस्थ विभाग या नावाने सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच या विभागामार्फत प्रमाणपत्र ते पदव्युत्तर पदवी स्तरावरील शिक्षणक्रम अंमलबजावणीसाठी शुल्क संरचनेला मान्यता देण्यात आली. विद्यापीठाच्या पीएच.डी. मार्गदर्शकांसाठी नवीन नियमावली तयार करण्यासाठी या बैठकीत समिती स्थापन करण्याला मान्यता देण्यात आली.

आजच्या बैठकीत विद्यापीठाने गुडस् ॲण्ड सर्व्हिस टॅक्स् (जीएसटी) हा एक वर्षाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता दिली. जीएसटी वरील असा अभ्यासक्रम सुरु करणारे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ हे पहिले विद्यापीठ ठरले असून हा अभ्यासक्रम तयार करणाऱ्या समितीचे या बैठकीत अभिनंदन करण्यात आले. बारावी उत्तीर्ण विद्यार्थी या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतील. या शैक्षणिक वर्षात हा अभ्यासक्रम सुरु केला जाणार आहे. बैठकीच्या प्रारंभी ज्येष्ठ साहित्यिक डॉ.गंगाधर पानतावणे यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी बैठकीत सदस्यांच्या शंकांचे निरसन कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील व प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी केले. कुलसचिव भ.भा.पाटील यांनी बैठकीचे सुत्रसंचालन केले.

------------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र. : उमवि/१६/हस्तदेय/२०१८ दिनांक : २९ मे, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी